30 APR 2025
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बसवण्णांचे विचार कालसुसंगत

## सतेज पाटील; अध्यासनाच्या कार्यालयाचे लोकार्पण

कोल्हापूर, ता. २९ : 'महात्मा बसवण्णांचे विचार आजही कालसुसंगत असून, ते पुढे घेऊन जाण्याचे कार्य केले पाहिजे', असे प्रतिपादन आमदार सतेज पाटील यांनी आज येथे केले.

महात्मा बसवण्णा जयंतीच्या पूर्वसंध्येला शिवाजी विद्यापीठातील शरण साहित्य अध्यासनाच्या नूतनीकरण केलेल्या कार्यालयाचे लोकार्पण व अध्यासनास पाच लाख रुपयांच्या ग्रंथांचे हस्तांतरण कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी, तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची विशेष उपस्थिती होती.

आमदार पाटील म्हणाले, 'जातीभेद दूर ठेवून सर्वांना सोबत घेऊन पुढे जाण्याचे मोठे कार्य महात्मा बसवण्णांनी बाराव्या शतकात केले. हे विचार आजच्या काळामध्ये खूप उपयुक्त आहेत. त्यांच्या विचारांचा वसा पुढे घेऊन जाण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. शरण साहित्याचे कंटेंट ऑनलाईन उपलब्ध होण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. त्याचबरोबर ज्या महापुरुषांचा इतिहास आपण सांगतो, त्यांचे विचार पुढे घेऊन जातो, त्यांच्या विचारांचा इतिहास ऑनलाईन उपलब्ध होण्यासाठी प्रयत्न व्हावेत. तंत्रज्ञानाचा उपयोग उद्याच्या भविष्यकाळात आपला खरा इतिहास बदलण्यासाठी होऊ नये. तो तसाच टिकून राहावा, यासाठी सर्वांनी प्रयत्न केले पाहिजेत. शासनाने महापुरुषांचे अध्यासन होण्याच्या दृष्टीने योग्य ते धोरण स्वीकारून निधी देण्यास सुरू केले आहे. ज्या भूमीला इतिहास असतो, ती भूमी भूगोल घडवते.'



**कोल्हापूर :** नूतनीकरण केलेल्या कार्यालयाचे लोकार्पण करताना आमदार सतेज पाटील. शेजारी डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे.

आमदार प्रा. जयंत आसगावकर म्हणाले, 'समाजामध्ये समता, बंधुता पसरविण्याची भूमिका महात्मा बसवण्णांनी घेतली होती. त्यांचे मार्गदर्शक विचार शरण साहित्याच्या माध्यमातून आजच्या तरुण पिढी पुढे आले पाहिजेत. विद्यापीठातील शरण साहित्य अध्यासन राज्यातील पहिले अध्यासन केंद्र आहे.'

डॉ. शिर्के यांनी, बसवण्णांच्या विचार कार्यामध्ये श्रमाधिष्ठित जीवन, स्वयंपूर्ण व स्वावलंबी समाज आणि स्त्री-पुरुष समानता सूत्र आढळते. ऑनलाईन कंटेंटच्या माध्यमातून महामानवांचे कार्य पुढे घेऊन जाण्याचे काम विद्यापीठामध्ये सुरू झाले आहे, असे सांगितले. याप्रसंगी सूर्यकांत पाटील-बुद्धीहाळकर, ॲड. अभिषेक मिठारी यांनी मनोगत व्यक्त केले.

अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. रघुनाथ धमकले, डॉ. शरद बनसोडे, डॉ. व्ही. एम. पाटील, डॉ. विजय ककडे, यश आंबोळे, सरलाताई पाटील, 'अक्षर दालन'चे आलोक जोशी उपस्थित होते. डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.

30 APR 2025
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वैचारिक प्रदूषणात शरण साहित्याचे आचरण गरजेचे

## सतेज पाटील : शरण साहित्य अध्यासनाच्या कार्यालयाचे लोकार्पण

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** महात्मा बसवेश्वर यांनी बाराव्या शतकात सर्वांना बरोबर घेऊन जाण्याची भूमिका घेतली. त्यांनी आपल्या वचनातून मानवतेचा संदेश दिला. मात्र, एकविसाव्या शतकातही समानता दिसत नाही. त्यामुळे सध्याच्या वैचारिक प्रदूषणाच्या काळात शरण साहित्य आचरणाची गरज आहे, असे प्रतिपादन काँग्रेसचे विधान परिषदेतील गटनेते, आमदार सतेज पाटील यांनी मंगळवारी केले.

शिवाजी विद्यापीठातील शरण साहित्य अध्यासनाच्या नूतनीकरण कार्यालयाचे लोकार्पण आणि पाच लाख रुपयांच्या पुस्तक हस्तांतरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. आमदार सतेज पाटील यांच्या फंडातून पाच लाख रुपयांची साडेतीन हजार पुस्तके शरण साहित्य अध्यासनाला भेट देण्यात आली, तर आमदार जयंत आसगावकर यांच्या फंडातून शरण साहित्य अध्यासन कार्यालयाचे नूतनीकरण करण्यात आले.



शिवाजी विद्यापीठातील शरण साहित्य अध्यासनाच्या नूतनीकरण कार्यालयाच्या लोकार्पण कार्यक्रमात आमदार सतेज पाटील यांनी पाच लाख रुपयांची पुस्तके अध्यासनासाठी कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे सुपूर्द केली. यावेळी आमदार जयंत आसगावकर, ॲड अभिषेक मिठारी, डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. प्रमोद पाटील, डॉ. तृप्ती करेकट्टी उपस्थित होते.


आमदार पाटील म्हणाले, जातीभेद दूर ठेवून सर्वांना सोबत घेऊन पुढे जाण्याचे मोठे कार्य महात्मा बसवण्णांनी सुरू केले. हे विचार आजच्या काळामध्ये खूप उपयुक्त आहेत. तंत्रज्ञानाच्या युगात गुगलवर चुकीचा इतिहास सांगितला जातो. भविष्यात हा इतिहास तरुणांनी खरा मानू नये, यासाठी अध्यासनाने बसवेश्वरांचा खरा इतिहास ऑनलाइन उपलब्ध करून द्यावा. आमदार जयंत आसगावकर म्हणाले, शरण साहित्य अध्यासनाच्या माध्यमातून बसवेश्वरांचे कार्य तरुणाईपर्यंत पोहचेल. तरुणाईने बसवेश्वरांच्या साहित्याचा अभ्यास करून संशोधन केले पाहिजे. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, बसवेश्वर यांच्या विचार कार्यामध्ये श्रमाधिष्ठित जीवन, स्वयंपूर्ण व स्वावलंबी समाज आणि स्त्री-पुरुष समानता हे सूत्र आढळते. यावेळी सूर्यकांत पाटील-बुद्धीहाळकर, ॲड. अभिषेक मिठारी यांनी मनोगत व्यक्त केले.

समन्वयक डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी प्रास्ताविक केले. यश आंबोळे यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, सरलाताई पाटील, टी. एस. पाटील, डॉ. शरद बनसोडे, संजय जाधव, विनोद पंडीत उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 APR 2025
पुढारी


डॉ. संजय चव्हाण


अजित देशमुख


नमिता नाईकनवरे


कुमार चौधरी

# माहिती-तंत्रज्ञानाला बळ देणाऱ्या रासायनिक संयुगाचा शोध

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचे वरिष्ठ रसायनशास्त्रज्ञ डॉ. संजय चव्हाण यांनी संशोधक विद्यार्थ्यांसह केलेल्या महत्त्वपूर्ण संशोधनास नुकतेच जर्मन पेटंट मिळाले आहे. या संशोधनामुळे माहिती -तंत्रज्ञान क्षेत्राला बळ देणाऱ्या रासायनिक संयुगाचा शोध लागला आहे.

'सिस्टीम फॉर प्रिपेरिंग बायन्युक्लिअर कॉपर कॉम्प्लेक्सेस विथ कार्बन रिच अल्कीनील फंक्शनलाईज्ड सॅलिसिलीडीमाईन' या विषयावर विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातील डॉ. चव्हाण व त्यांचे विद्यार्थी अजित देशमुख, नमिता नाईकनवरे, कुमार चौधरी यांनी संशोधन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 APR 2025
पुढारी

# शिवाजी विद्यापीठ सत्र परीक्षेला ४८ हजार विद्यार्थी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील परीक्षेला ४८ हजार ३८८ विद्यार्थी उपस्थित होते. तसेच आजअखेर ३० अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत. विद्यापीठ संलग्न महाविद्यालयात पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरु आहेत. मंगळवारी बीए., बी.कॉम., बी.एस्सी., बीसीए., बीए.बीएड., बीआयडी., बीबीए., एमबीए., बीडीएफ, बॅचलर ऑफ लॉ, एमएसडब्ल्यू, एम.कॉम. परीक्षा पार पडल्या.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 APR 2025
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठ अंतर्गत ३० अभ्यासक्रमाचे निकाल जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मार्च/एप्रिल-२०२४ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. यापैकी ३० अभ्यासक्रमाचे गुरूवारी निकाल जाहीर केले आहेत. मंगळवारी बी.ए., बी.कॉम., बीएसस्सी, बीसीए, बीलिप, बीएड्, बीएबीएड, एमलिप, बीबीए, एमबीए, बॅचलर ऑफ एमएस्सी, एम.एसडब्लू आदी ११८ अभ्यासक्रमाच्या परीक्षा झाल्या. ही परीक्षा २११ परीक्षा केंद्रावर ४८ हजार ३८८ विद्यार्थ्यांनी दिली. भरारी पथकाकडून कोल्हापूर ४२, सांगली ११ आणि सातारा ४ अशा ५७ गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीकडे केली आहे. या विद्यार्थ्यांवर नियमानुसार कारवाई केली जाणार आहे, तरी विदयार्थ्यांनी नियमांच्या अधिन राहून परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 APR 2025

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Estd : 1962
'A++' Accredited by NAAC (2021)
with CGPA 3.52

## प्रवेश सूचना

**सन २०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षातील एम.एस्सी. व तत्सम अभ्यासक्रमाकरिता प्रवेश अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ**

**संदर्भ - या कार्यालयाची दि.०८/०३/२०२५ व दि.०८/०४/२०२५ रोजीची जाहिरात.**

सन २०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षातील विद्यापीठ विविध अधिविभागात व संलग्नित महाविद्यालय येथे शिकविल्या जाणाऱ्या एम.एस्सी. व तत्सम अभ्यासक्रमास ऑनलाईन प्रवेश अर्ज करण्यासाठी दि.०७/०५/२०२५ अखेर मुदतवाढ देण्यात आली आहे. प्रवेश परीक्षा दि. १३/०५/२०२५ ते दि.१७/०५/२०२५ या कालावधीत घेण्यात येईल. प्रवेश परीक्षेचे अंतिम वेळापत्रक लवकरच विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

ज्या नियमित अभ्यासक्रमांना प्रवेश परीक्षा नाही अशा एम.ए., एम.कॉम., एलएल.एम., इ. अभ्यासक्रमांसाठीही अर्ज भरण्यासाठी दि.३१/०५/२०२५ अखेर मुदतवाढ देण्यात आली आहे.

यासंदर्भात सविस्तर माहितीचा तपशील विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे, याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

https://www.unishivaji.ac.in/mscadmission/
For-Student-Information.

तसेच संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक व संबंधित पालकांनी इच्छुक विद्यार्थ्यांना प्रवेश अर्ज भरण्यासाठी प्रोत्साहित करावे.

ठिकाण : कोल्हापूर
दिनांक : ३०/०४/२०२५

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव